सन २०१७-१८ मध्ये नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्पाकरिता रू. ७०५.०८ लक्ष निधी वितरित करणेबाबत..

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक : राकृवि-०६१७/प्र.क्र.६५/राकृवियो कक्ष
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२
दिनांक- ०९ जानेवारी, २०१८

वाचा:-

१. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. हअप्र-७१६/प्र.क्र.८२/राकृवियो कक्ष, दि. ०७/०७/२०१६
२. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. हअप्र-७१६/प्र.क्र.८२/राकृवियो कक्ष, दि. १०/०८/२०१६
३. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. हअप्र-७१६/प्र.क्र.८२/राकृवियो कक्ष, दि. २८/१०/२०१६
४. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. हअप्र-७१६/प्र.क्र.८२/राकृवियो कक्ष, दि. १७/०१/२०१७
५. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. राकृवि-०६१६/प्र.क्र.७९/राकृवियोकक्ष, दि. १८/०७/२०१७
६. वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३ दि.१८/०४/२०१७
७. नानाजी देशमुख कृषि संजिवनी प्रकल्प, कार्यालयाचे पत्र क्र. नादेकृसंप्र/प्र.क्र.४/२०१७ दि.२२/११/२०१७

प्रस्तावना:-

मराठवाडा व विदर्भातील शेतक-यांना गेल्या काही वर्षापासून दुष्काळास तसेच नापिकीस वारंवार सामोरे जावे लागत आहे. हवामान बदलाचा शेतीवर विपरित परिणाम होऊन शेतीतील घटत्या नफ्यामुळे या भागातील शेतक-यांमध्ये तणाव ग्रस्तता वाढत आहे. त्यामुळे हवामान बदलानुकूल (Climate Resilient) शेती तंत्रज्ञान अवलंब करणेकरिता जागतिक बँक अर्थसहाय्यित नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्पाची जळगाव आणि विदर्भ व मराठवाड्यातील शेतक-यांच्या आत्महत्यांनी ग्रस्त असलेल्या १४ जिल्ह्यांसह एकूण १५ जिल्ह्यांमधील ५१४२ गावांमध्ये अंमलबजावणी करण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. सदर प्रकल्पाची सन २०१८-१९ पासून आगामी ६ वर्ष कालावधीत पूर्ण क्षमतेने अंमलबजावणी करण्यात येणार असून प्रकल्पामध्ये सुमारे रू. ४००० कोटी रकमेची गुतवणुक करण्यात येणार आहे.या प्रकल्पाच्या माध्यमातून हवामान बदलास असुरक्षित असलेल्या गावांमध्ये बदलत्या हवामानानुसार Climate Smart शेती तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यात येणार आहे व शेतक-यांना त्याकरिता आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात

येणार आहेत जेणेकरून शेतीतील नफ्याचे प्रमाण वाढेल तसेच, पूर्णा नदीच्या खो-यातील खारपान पट्टयातील ९३२ गावांमध्ये भूजल क्षारतेच्या समस्येच्या अनुषंगाने सदर भूभागाच्या अनुकूल शेती पध्दतीचा व तंत्रज्ञानाचा शेतक-यांमध्ये प्रसार करण्यात येणार आहे.

चालू वर्षापासून नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्पाची एकूण १५ जिल्ह्यातील, १५० गावांमध्ये (प्रत्येक जिल्ह्यातील १० गावे) राबविण्याबाबत तातडीने अंमलबजावणी करावयाची आहे.त्यानुसार प्रकल्प कक्षाने प्रकल्पांतर्गत निवडलेल्या गावांचे micro-plan तयार करण्याचे, प्रकल्पाकरिता ICT (Information and Communications Technology) चे काम पाहण्यासाठी यंत्रणांची निवड केली असून, Micro-Plan नुसार संबंधित गावांमध्ये चालू वर्षी काम हाती घेण्याचे नियोजित आहे.त्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन कक्षास, आस्थापना विषयक विविध बाबींवर खर्च अपेक्षित असल्याचे प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्प यांनी कळविलेले आहे. या खर्चासाठी सन २०१७-१८ मध्ये प्रकल्पाच्या राज्य हिस्स्याच्या लेखाशिर्षाखाली अर्थसंकल्पीत केलेल्या तरतूदीतून निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती, त्यानुषंगाने शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे-

शासन निर्णय :

१ या शासन निर्णयान्वये प्रकल्प संचालक नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्प यांना रू. ७०५.०८ लक्ष (रू. सात कोटी पाच लाख आठ हजार फक्त) निधी वितरित करण्यास मान्यता देण्यात येत असून सदर निधी बाब निहाय खालील प्रमाणे वितरित करण्यात येत आहे.

अ.क्र.	**उद्दिष्ट शिर्ष**	**रक्कम**
१	०१- वेतन	रू. ३३.४३ लक्ष
२	२८- व्यावसायिक सेवा	रू. १७१.६५ लक्ष
३	३३- अर्थसहाय्य	रू. ५००.०० लक्ष
	एकूण	**रू. ७०५.०८ लक्ष**

उपरोक्त उद्दिष्ट शिर्ष " ०१-वेतन व २८- व्यावसायिक" सेवा करिता अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या रकमेपेक्षा अतिरिक्त निधीची आवश्यकता असल्याने, ३३-अर्थसहाय्य या बाबीकरिता अर्थसंकल्पित असलेल्या रकमेतून एकूण रू १६७.५८ लक्ष निधी पुनर्वितरित करून उपलब्ध करून देण्यात आला आहे, सदर पुनर्वितरणाचा तपशिल या शासन निर्णयासोबतच्या **परिशिष्ट-अ** मध्ये नमूद केला आहे.

२ या शासन निर्णयान्वये सन २०१७-१८ करिता नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाकरिता राज्यहिस्स्याचा रू. ७०५.०८ लक्ष निधी प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषी संजीवनी

प्रकल्प, मुंबई यांना अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीव्दारे वितरित करण्यात येत आहे.सदर निधी सन २०१७-१८ मध्ये प्रकल्पाकरिता पुढील लेखाशिर्षाखाली अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या तरतूदीतून खर्ची टाकावा.

"मागणी क्रमांक डी-३,
२४०१ पीक संवर्धन,
(११५) लहान /सिमांत शेतक-यांची आणि शेतमजुरांची योजना,
(००) (०३) हवामान अनुकूल कृषि प्रकल्प, (राज्य हिस्सा ३०%)
(२४०१ A६५५) "
०१- वेतन
२८- व्यावसायिक सेवा
३३-अर्थसहाय्य

३ या शासन निर्णयाव्दारे उपलब्ध करून देण्यात येत असलेल्या रू. ७०५.०८ लक्ष निधीचे कोषागारातून आहरण व वितरणाकरिता प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी आणि वित्त विशेषज्ञ, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४ सदर प्रकल्प जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने राबविण्यात येत असल्याने जागतिक बँकेने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार ,सदर वितरित निधी केवळ तातडीच्या व अनिवार्य अशा बाबींसाठी आहरित करावा,तसेच निधीच्या खर्चाची निकड व औचित्याची पडताळणी प्रकल्प संचालकांनी करावी. त्याचप्रमाणे सदर वितरित/पुनर्वितरित निधी अखर्चित राहणार नाही याची दक्षता प्रकल्प संचालकांनी घ्यावी.

५ या शासन निर्णयान्वये उपलब्ध करून देण्यात आलेल्या निधीचा तात्काळ विनियोग करण्यात यावा तसेच प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्प, मुंबई यांनी वेळोवेळी उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

६ हा शासन निर्णय वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३ दि. १८ एप्रिल,२०१७ नुसार विहीत केलेल्या अटींची पूर्तता होत असल्याने, सदर परिपत्रकानुसार या विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक क्र. अनौसं- २/अर्थ-१३, दि. ०२/०१/२०१८ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७ सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०१०९१५४७०९४३०१ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरिने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shrikant Chandrakant Andge

Digitally signed by Shrikant Chandrakant Andge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1bee0fffaa62085c34db6bfd8c, serialNumber=d8d9626c9e038380cd235c048f20d7ce74cffd3a95f2ac3c192e9c991f358271, cn=Shrikant Chandrakant Andge
Date: 2018.01.10 13:28:45 +05'30'

(श्रीकांत चं. आंडगे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१ मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई

२ अपर मुख्य सचिव (वित्त) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

१ अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई

४ प्रधान सचिव (कृषी व पणन), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई

५ प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्प, मुंबई

६ आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

७ महालेखाकार (स्थानिक निकाय लेखा परिक्षा व लेखा), मुंबई

८ महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र१/२, मुंबई/नागपूर

९ महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र१/२, मुंबई/नागपूर

१० वित्त विभाग (कार्यासन व्यय -१/अथसंकल्प-१३), मंत्रालय, मुंबई

११ कार्यासन २-अे कृषी व पदुम विभाग मंत्रालय, मुंबई

१२ मा. मंत्री (कृषी), यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई

१३ निवड नस्ती.

परिशिष्ट – अ

शासन निर्णय क्रमांक राकृवि-०६१७/ प्र.क्र. ६५/राकृवियो कक्ष, दिनांक ०९ जानेवारी, २०१८ सोबतचे परिशिष्ट

(रूपये लाखात)

अ. क्र.	तपशिल	ज्या उद्दीष्ट शिर्षातून निधी पुनर्वितरीत करावयाचा आहे त्याचा तपशिल	ज्या उद्दीष्ट शिर्षांना निधी पुनर्वितरित करावयाचा आहे त्याचा तपशिल	
	i.	ii.	iii	iv
१.	**उद्दीष्ट शिर्ष**	**३३ – अर्थसहाय्य**	**०१ – वेतन**	**२८ – व्यावसायिक सेवा**
२.	मूळ अर्थसंकल्पित तरतूद	१९७३.००	१००.००	२५.००
३.	यापूर्वी वितरीत तरतूद	निरंक	७०.००	१७.५०
४.	शिल्लक अर्थसंकल्पित तरतूद (२-३)	१९७३.००	३०.००	७.५०
५.	या शासन निर्णयान्वये वितरीत निधी	५००.००	३०.००	७.५०
६.	शिल्लक अर्थसंकल्पित तरतूद (४-५)	१४७३.००	निरंक	निरंक
७.	**पुनर्वितरणाची रक्कम (iii+iv)**	**१६७.५८**	**३.४३**	**१६४.१५**
८.	पुनर्वितरणानंतर शिल्लक अर्थसंकल्पित तरतूद (६-७)	१२९७.९२	३.४३	१६४.१५
९.	पुनर्वितरणानंतर वितरित करावयाची तरतूद	-	३.४३	१६४.१५
१०	चालु वर्षी एकूण वितरीत तरतूद (३ +५+ ९)	५००	१०३.४३	१८९.१५